## ‘महाविद्यालय हसायला बोलायला व माणूस म्हणून जगायला शिकवत’

:- प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे

कोल्हापूर - ता. ०७ :- महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव, संवाद साधण्याचे कौशल्य नसते. त्यांच्या स्वप्नांना योग्य दिशा नसते. अशा विद्यार्थ्यावर महाविद्यालयात जाणीवपूर्वक संस्कार केले जातात. त्यातून विद्यार्थ्यांच्या जीवनाची जडण घडण होते. यामुळे विद्यार्थी हसायला, बोलायला व माणूस म्हणून जगायला शिकतो. असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले. ते कला व वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्षाच्या शुभेच्छा समारंभ प्रसंगी विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना बोलत होते.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले भविष्यकाळात संयमी व समजुतदार रहा. काळाची पाऊले ओळखून जगायला शिका. संगणकाचे ज्ञान आत्मसात करा. सुटट्ीचा वेळ वाया प्रवेश परीक्षेंचा अभ्यास करण्यासाठी घालवा.

याप्रसंगी डॉ. शरद गायकवाड, प्रा. डी.एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रा. शिरीष शितोळे यांनी पेपर सादरीकरणाची तंत्रे या विषयावर मार्गदर्शन केले. प्रकाश तारु, रोहण गवळी, कु. पल्लवी मोरे, संतोष गायकवाड इ. मुलांनी मनोगत व्यक्त केले. तसेच कु. कविता जाधव हिला विद्यापीठ अनुदान आयोगाची रु. ४०,०००/- (अक्षरी रु. चाळीस हजार) ची शिष्यवृत्ती मिळाल्याबदद्ल मा. प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. बाबासाहेब उलपे यांनी तरी आभार अक्षय निर्मळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश कांबळे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.